|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जावक क्रमांक :कबचौउमवि/7-ग/संगणक स्टेशनरी/2910/2022, दिनांक : 26.11.2022

28-11-2022

प्रति,
ॲटलांटा फार्मस प्रा.लि.
प्लॉट नं.अे/164, एम.आय.डी.सी.खैरेने टीटीसी कॉम्प्लेक्स,
व्हाईट हाऊसच्या मागे, जेसीबी क्रेनच्या समोर
नवी -मुंबई-400 013.

विषय :- आपल्या फर्मचे नाव पुरवठादारांच्या काळया यादीत (Black List) समाविष्ट केल्याबाबत.

**संदर्भ** :- 1) विद्यापीठ निविदा उमवि/7-जी/ET/Computer Stationary/867/2022, दि.22.04.2022
2) जा.क्र.:कबचौउमवि/7-ग/संगणक स्टेशनरी/2022/2022,दिनांक:26.08.2022
3) जा.क्र.:कबचौउमवि/7-ग/संगणक स्टेशनरी/2023/2022,दिनांक:26.08.2022
4) आपले कडील दि.27/08/2022 रोजीचा ई-मेल.
5) जा.क्र.कबचौउमवि7-ग/संगणक स्टेशनरी/2066/2022, दि.30/08/2022 वार्षिक सुधारीत दर कराराचे पत्र.
6) जा.क क्रमांक :कबचौउमवि/7-ग/संगणक स्टेशनरी/2067/2022, दि. 30.08.2022
7) जा.क्र.कबचौउमवि7-ग/संगणक स्टेशनरी/2152/2022, दि.13/09/2022
8) जा.क्र.कबचौउमवि/7-ग/संगणक स्टेशनरी/2534/2022, दिनांक: 21.10.2022

**महोदय,**

उपरोक्त संदर्भांकीत विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संगणकीय स्टेशनरी साहित्याचा पुरवठा करण्यासाठी संदर्भ क्र.1 अन्वये ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. आपण सादर केलेली ई-निविदा सर्वात किमान दरांची असल्याने विद्यापीठाने स्वीकार करुन संदर्भ क्र.2 अन्वये वार्षिक दर करण्यात आल्याबाबत कळविण्यात आलेले होते. तसेच दर करारांतर्गत आपणास संदर्भ क्र.3 अन्वये पुरवठा आदेश निर्गमीत करुन साहित्याचा पुरवठा करण्याबाबत कळविले होते.

त्या अनुषंगाने, आपण संदर्भ क्र.4 अन्वये विद्यापीठास पाठविलेल्या ई-मेलमध्ये नमूद केल्यानुसार सध्या कागदांचे दर मोठया प्रमाणात वाढलेले असल्याने ई-निविदेत नमूद केलेल्या दरांनुसार वार्षिक दर करारांतर्गत किंमतीत साहित्याचा पुरवठा करण्यात असमर्थ असल्याबाबत कळवून Escalation of Rate अंतर्गत किंमतीत वाढ झाल्याने 20% दर सुधारीत दर करुन दिल्यास आम्ही पुरवठा करण्यास तयार असल्याबाबत ई मेलव्दारे कळविलेले होते. या संदर्भात विद्यापीठाव्दारे गठित समितीच्या सभेत आपणाशी दूरध्वनीवरुन झालेल्या चर्चेत आपण सहमती दिल्यानुसार संदर्भ क्र.05 अन्वये दरवाढ मान्य केल्याबाबत आपणास कळविण्यात आलेले आहे. उपरोक्त दरवाढ मान्य केल्यानंतर परीक्षांच्या कामाची निकड लक्षात घेता, संदर्भ क्र.6 व 7 नुसार पुरवठा आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत.

परंतू आपणाशी स्टेशनरीचा पुरवठा करण्यासंदर्भात दूरध्वनीव्दारे वेळोवेळी पाठपुरावा करुनही आपल्या फर्म / कंपनीने कुठलाही प्रतिसाद दिलेला नाही. विद्यापीठ परीक्षांचे कालमर्यादित स्वरुपाच्या कामकाजांचे महत्व विचारात न घेता संगणकीय स्टेशनरी साहित्याचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे परीक्षांच्या कामकाजात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने आपल्या फर्म / कंपनीचे नाव संदर्भ क्र.08 अन्वये पुरवठादारांच्या काळया यादीत समाविष्ट करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. सदर नोटीसचे आपण उत्तर अद्याप पावेतो दिलेले नाही. विद्यापीठास संगणकीय स्टेशनरी साहित्याच्या पुरवठया संदर्भात वेळावेळी पाठपुरावा करुनही भ्रमणध्वनीवरुन संपर्क टाळणे, दुर्लक्ष करणे, प्रतिसाद न देणे, हेतुपुरस्सर दिरंगाई करणे, इत्यादी बाबींमुळे आपण दंडात्मक कारवाईस पात्र आहात. त्यामुळे आपणाकडून निविदेतील अटी व शर्तीचा भंग झालेला असून विद्यापीठाच्या कामकाजात निर्माण झालेल्या अडचणी लक्षात घेता आपल्या फर्म / कंपनीचे नाव पुरवठादाराच्या काळया यादीत (Black listed supplier) कायमस्वरुपी समाविष्ट करण्यात येत आहे,याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

(सीए रविंद्र एन.पाटील)
वित्त व लेखा अधिकारी

प्रत माहितीसाठी :

1) कक्षाधिकारी, खरेदी विभाग,कबचौउमवि,जळगाव.
2) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि,जळगाव.
3) एमकेसीएल, कार्यालय